ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १८ ऑगस्ट, १९५४ | अंक ३२

## विविध माहिती

**मद्रास राज्यांतील आत्महत्या**—१९५२–५३ सालीं मद्रास राज्यांत ३,०६६ माणसांनीं आत्महत्या केली अशी माहिती राज्याच्या विधिमंडळांत सांगण्यांत आली. मलबार जिल्ह्यांत ३८१, कोइमतूर व सालेम जिल्ह्यांत अनुक्रमें ३२२ व ३११ माणसांनीं आत्महत्या केली. निलगिरी जिल्ह्यांत सर्वांत कमी म्हणजे २८ आत्महत्या झाल्या.

**राणीच्या बागेंत चिम्पँझी वानर**—मुंबई येथील राणीच्या बागेंत चिम्पँझी जातीचे दोन वानर लवकरच ठेवण्यांत येणार आहेत. दोन्ही वानर मलायांतील जंगलांत एका शिकाऱ्यानें पकडले आणि विक्रीस काढले. मुंबई कॉर्पोरेशच्या स्टँडिंग कमिटीनें वानरांना मुंबईस आणण्यासाठीं ८,२०० रुपयांची रकम मंजूर केली आहे.

**अजिंठा येथील चित्रकला**—भारत स्वतंत्र होण्यापूर्वी अजिंठा येथील लेण्यांची व्यवस्था निझामाकडे होती. निझाम सरकारनें लेण्यांतील चित्रकला शाबूत राखण्यासाठीं कांहीं युरोपिअन तज्ज्ञांचा सल्ला घेऊन चित्रावर व्हारनिशचा हात दिला होता. त्यामुळें चित्रांचा मूळचा रंग निष्कारण चकाकत असे. चित्रावरील हा थर काढून टाकण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें.

**पूरपीडितांसाठीं मदत**—आसाम व बिहारमध्यें आलेल्या पुरामुळें लाखों लोकांची उपासमार झाली आहे. अशा लोकांना पोषक द्रव्यांच्या व क्षारांच्या गोळ्या देण्याची तयारी लीडरल लॅबोरेटरी इंडिआ ह्या कंपनीनें दाखविली आहे. कंपनीकडून देऊं करण्यांत आलेल्या १ लाख गोळ्यांची किंमत २५,००० रुपये आहे. भारताच्या आरोग्यमंत्र्यांनीं देणगीचा स्वीकार केला आहे.

**उत्तर-प्रदेशांत माकडांचा उपद्रव**—उत्तर-प्रदेशांत माकडांचा उपद्रव मोठ्या प्रमाणावर नेहमींच होत असतो. माकडांचा उपद्रव कसा थांबवावा ह्यासंबंधीं राज्याच्या विधिमंडळाच्या शेती-विषयक स्थायीसमितींत नुकतीच चर्चा करण्यांत आली. सभासदांनीं पुष्कळ सूचनाहि केल्या. अखेर ज्यांना बंदूक चालवितां येते त्यांना जास्तींत जास्त माकडें मारण्यास उत्तेजन यावें असें ठरलें. ह्या उपायानें पंजाब, मध्यप्रदेश आणि ओरिसा राज्यांतील उपद्रव कमी झाला आहे.

**मद्रास राज्यांतील प्रौढांचें शिक्षण**—मद्रास राज्याच्या १९५२–५३ सालच्या अंदाजपत्रकांत प्रौढांचें शिक्षण आणि रात्रीं चालणाऱ्या शाळा ह्यासाठीं ७,२५,००० रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष खर्च मात्र ८,०३,५३९ रुपये झाला अशी माहिती राज्याच्या विधिमंडळांत सांगण्यांत आली.

**जपानकडून मिळूं शकणारीं स्वस्त रेल्वे एंजिनें**—भारताची वहातुकीची व्यवस्था सुधारण्यासाठीं अमेरिकेच्या परदेशीय मदत-संघटनेनें १०० रेल्वे-एंजिनांची शिफारस केली होती. ही रेल्वे-एंजिन्स पुरविण्याचें सर्वांत स्वस्त टेंडर जपानी कंपनीनें पाठविलें असल्याचें समजतें. जपानीज रोलिंग स्टॉक एक्सपोर्ट असोसिएशन ह्या टोकिओच्या कंपनीनें ८१,४७,००० डॉलर्स किंमत घेऊन १०० एंजिन्स पुरविण्याचें कबूल केलें आहे.

**रशिआंत तेलाचा नवा सांठा**—स्टॅलिनग्रॅडच्या जवळ असलेल्या व्होल्गा नदीच्या आसमंतांतील सपाट प्रदेशांत तेलाच्या नव्या सांठ्याचा शोध लागला असल्याचें समजतें. ह्या भागांत आतां एक नवेंच औद्योगिक केंद्र निर्माण झालें असून तेल उपसणाच्या बऱ्याच विहिरीहि खोदण्यांत आल्या आहेत.

**अहमदाबाद येथें ४ नवीन कॉलेजें**—अहमदाबाद येथें ४ नवीन कॉलेजें निघणार असल्याचें समजतें. त्यांपैकीं एक कॉलेज सायन्स ह्या विषयाचें असेल. ह्या नवीन योजनेचा विचार करण्यासाठीं गुजराथ विद्यापीठाच्या सिंडिकेटनें एक कमिटी नेमली आहे.

**कँबेच्या विकासाची मागणी**—मुंबई राज्यांतील एक लहान बंदर म्हणून कँबेचा विकास करण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत त्या बंदराचा समावेश करण्यांत यावा अशी मागणी गुजराथ चेंबर्स ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे. ह्या बंदराचा विकास करण्यासाठीं ३० लाख रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**दारूबंदीच्या कायद्यांत सुधारणा**—काकवीचा उपयोग करून दारू गाळण्याच्या भट्ट्या सर्वच प्रांतांतून असतात. काकवीचा हा दुरुपयोग थांबविण्यासाठीं काकवीवर नियंत्रण ठेवणें जरूर आहे असें मद्रास सरकारला वाटत आहे. योग्य तें नियंत्रण ठेवतां यावें म्हणून राज्य-सरकार दारूबंदीच्या कायद्यांत दुरुस्ती करून घेणार आहे.

**ग्रहांच्या दरम्यान प्रवासाची शक्यता**—जर्मनीमधील इन्सब्रुक ह्या गांवीं ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्यासंबंधीं संशोधन करणाऱ्या १०० तज्ज्ञ शास्त्रज्ञांची एक परिषद नुकतीच भरली होती. परिषदेसाठीं अणुविषयक तज्ज्ञ आणि विमानें तयार करणारे एंजिनिअर्सहि जमले होते.

**पठाणकोट-जम्मू रेल्वे रस्ता**—पठाणकोट व जम्मू ह्यांच्या दरम्यान रुंद रुळाचा रेल्वे-रस्ता बांधण्याच्या योजनेचा विचार रेल्वेबोर्ड करीत आहे. ह्या योजनेचा अभ्यास करण्यासाठीं एंजिनिअर्सचें एक मंडळ लवकरच पठाणकोटला जाणार आहे. योजनेला खर्च किती येईल आणि वेळ किती लागेल ह्यासंबंधीं तें अहवाल सादर करणार आहे.

## दि फलटण बँक लि., फलटण

अहवालाचें वर्ष म्हणजे ३१ डिसेंबर, १९५३ अखेरच्या वर्षी या बँकेचें उत्पन्न व व्यवहारांतील भांडवल वाढलें आहे. तरी तें [illegible] डिव्हिडंड देतां येणार नाहीं. जरूर तर बँकेचें सहकारी बँकेंत रूपांतर करावें, असें कांहीं व्यक्तींचें मत दिसून आल्यावरून कांहीं तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत आला. बँक उत्तम रीतीनें चालविणें ही गोष्ट निव्वळ सहकारी बँकेंत रूपांतर करून [illegible] नाहीं; बँकेंतील व्यवहार व ठेवी यांत वाढ झाली पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. जुन्या थकबाकयांच्या वसुलीचें काम प्रयत्नपूर्व चालू आहे. अहवालाचे वर्षांतील व्यवहारापैकीं कोणत्याहि तऱ्हेची थकबाकी येणें राहिलेली नाहीं. अहवालाचे वर्षी केवळ ४१९ रु. निव्वळ नफा झाला.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५२,६३० | रोख व बँकांत | १,२८,८९५ |
| रिझर्व्ह फंड | २६,४१२ | इन्व्हेस्टमेंट | १०,०५० |
| ठेवी | १,०६,५०२ | कर्जे | ३९,४७२ |

**सासरेच्या जाहिरातींचा उपद्रव**—न्यूयॉर्कमधील संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या इमारतीसमोर असणाऱ्या इमारतीवर अमेरिकेंतील नॅशनल शुगर रिफायनिंग कंपनी आपली जाहिरात लावणार आहे. जाहिरातीमधील अक्षरें २५ फूट उंचीचीं असतील आणि जाहिरातीची एकूण लांबी २०५ फूट होईल. अक्षरें प्रकाशित नळ्यांचीं होणार असल्यामुळें संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या इमारतीवर झगझगीत प्रकाश पडून तेथें एखादा क्लब असल्याचा भास होईल. ही अडचण लक्षांत घेऊन कंपनीनें अक्षरांची दिशा थोडीशी बदलण्याचें कबूल केलें आहे.

**ब्रिटनमधील जाहिरातींचा खर्च**—गेल्या वर्षी ब्रिटनमध्यें जाहिरातींवर २३,००,००,००० पौंड खर्च करण्यांत आले अशी माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. एका वर्षात जाहिरातींवर झालेल्या खर्चाचा हा उच्चांक आहे. १९५२ सालापेक्षा खर्चाची रक्कम ३,१०,००,००० पौंडांनीं अधिक आहे. असें असलें तरी अमेरिकेच्या मानानें ब्रिटनमध्यें जाहिराती देण्याची प्रवृत्ति कमीच दिसून येते. १९५२ सालीं ब्रिटनच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी जितकें उत्पन्न जाहिरातीवर खर्च करण्यांत आलें तें अमेरिकेंतील खर्चाच्या निम्मेंच होतें.


## हिंदी ( शेड्यूल्ड, बिगर-शेड्यूल्ड व सहकारी ) बँकांचीं प्रमुख देणीं व येणीं

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| | वर्ष | वसूल भांडवल | रिझर्व्ह | ठेवी | कर्जें | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| शेड्यूल्ड बँका ( १ इं. बँक, ७२ इतर हिंदी शे. बँका, १६ विदेशी शे. बँका ) | १९४७ | ३६,३९ | २२,०६ | १०७९,९९ | ४२५,२३ | ७,१९ |
| | १९४८ | ३६,९३ | २५ ७६ | १०४२,१६ | ४४२,०७ | ६,०७ |
| | १९४९ | ३६,६९ | २६,३५ | ९२५,६० | ४१८,०० | ७,७५ |
| | १९५० | ३५,८५ | २६ ६५ | ९२८,२३ | ४४०,४० | ७,४३ |
| | १९५१ | ३५,४५ | २७,३३ | ९१८,०९ | ५४५,१४ | ८,९५ |
| | १९५२ | ३३,७१ | २६,६५ | ८९१,८७ | ४७४,०० | ७,२९ |
| | १९५३ | ३२,७५ | २६,७२ | ९०५,८६ | ४३८,३० | ६,८५ |
| बिगर-शेड्यूल्ड बँका | १९४७ | ९,१५ | २,९४ | ८३,९६ | ५२,३३ | ८८ |
| | १९४८ | ९,२३ | ३,५३ | ७६,०७ | ४९,९८ | ५८ |
| | १९४९ | ९,७२ | ३,८७ | ७१,८७ | ५०,५९ | ६२ |
| | १९५० | १०,२६ | ३,९१ | ७३,६७ | ४५,७७ | ६८ |
| | १९५१ | ९,३९ | ३,९८ | ६९,९९ | ४५,७९ | ६३ |
| | १९५२ | ९,४९ | ४,६१ | ६२,७८ | ४२,०१ | ५२ |
| | १९५३ | ९,१३ | ४,६८ | ६३,७६ | ४१,०१ | ६३ |
| शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँका मिळून | १९४७ | ४५,६४ | २५,०० | ११६३,९५ | ४७७,५६ | ८,०७ |
| | १९४८ | ४६,१६ | २९,२९ | १११८,२३ | ४९२,०५ | ६,६५ |
| | १९४९ | ४६,४१ | ३०,२२ | ९९७,४७ | ४६८,५९ | ८,३७ |
| | १९५० | ४६,११ | ३०,५६ | १००१,९० | ४८६,१७ | ८,११ |
| | १९५१ | ४३,८४ | ३१.३१ | ९८८,०८ | ५९०,९३ | ९,५८ |
| | १९५२ | ४३,२० | ३१,२६ | ९५४,६५ | ५१६,०१ | ७,८१ |
| | १९५३ | ४१,८८ | ३१,४० | ९६९,६२ | ४७९,३१ | ७,४८ |
| सहकारी बँका | १९४७ | ५,५५ | ६,६० | ६६,८४ | ४०,३४ | |
| | १९४८ | ६,०४ | ७,०३ | ७२,०४ | ४३,४३ | ७५ |
| | १९४९ | ७,०८ | ७,७१ | ८७,८५ | ६१,१५ | ९१ |
| | १९५० | ८,०६ | ८,५१ | ९०,४३ | ६१,२६ | ९४ |
| | १९५१ | ९,२० | ९,२९ | १००,९९ | ७३,६५ | १,१२ |
| | १९५२ | १०,५५ | १०,२९ | १०५,८० | ८२,२४ | १,२६ |
| | १९५३ | १२,३७ | ११,७९ | ११६,९३ | ८७,८१ | १,३० |

# अर्थ

बुधवार, ता. १८ ऑगस्ट, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जागतिक चलननिधीचा अहवाल

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय चलननिधीचा पांचवा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यावरून असें दिसतें कीं, आंतरराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति सुधारत असून देशादेशांनीं देवघेवीच्या किंवा देण्याच्या व्यवहारावरील निर्बंध बरेच कमी केले आहेत. १९५४ च्या सुरुवातीला, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत कधींहि आढळून न येणारी सुस्थिति, देण्याघेण्याच्या व्यवहारांच्या बाबतींत दिसून आली. जागतिक आर्थिक परिस्थिति तुलनात्मकदृष्ट्या समाधानकारक राहून, आंतरराष्ट्रीय व्यापारांतहि स्थिरता दिसून आली. कांहीं देशांनीं अंतर्गत चलनव्यवहारावर नियंत्रणें ठेवलीं होतीं, व त्यामुळें त्यांचे व्यवहार स्थिर राहूं शकले. पश्चिम युरोपांतील व आशियांतील कांहीं देशांत चलन-विस्तार कमी होऊन किंमतीच्या बाबतींत संबंधित सरकारांना फारसें नियंत्रण ठेवावें लागलें नाहीं. व्यक्तिशः प्रत्येक देशाला जगांतील इतर देशांशीं सामान्यपणें सुरळित संबंध ठेवतां आले याचें कारण, जगांतील आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहाराचें स्थैर्य ही गोष्ट होय. अहवालाच्या वर्षांत स्टर्लिंग व तत्सम गटांतील देशांचा सुवर्ण व डॉलरनिधी २५० कोटी डॉलरनीं वाढला. याचा आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितीवर चांगला परिणाम झाला.

अहवालाच्या वर्षी निरनिराळ्या देशांच्या आर्थिक व्यवहारांच्या बाबतींत विशेष उल्लेखनीय गोष्टी म्हणजे व्यापार खाजगी व्यक्तींच्या किंवा व्यापाऱ्यांच्या हातांत जाणें, पूर्वीच्या जुन्या बाजारपेठा सुरू होणें, खरेदीच्या बाबतींत वायदे पुनः सुरू होणें, युरोपांतील जुन्या व्यापारी केंद्रांतून पुन्हां व्यापाराला सुरवात, पुरवठा निरनिराळ्या केंद्रांतून सहजसुलभ बनणें व अंतर्गत नियंत्रणाचें उच्चाटन, ह्या होत. आंतरराष्ट्रीय चलन-निधीनें सदस्य देशांना त्यांचे देण्याघेण्याचे व्यवहार सुरळीत करावयास बरीच मदत केली आहे, व नियंत्रणें सैल केल्यामुळें कोणते फायदे होऊं शकतात याबद्दल. माहिती सदस्य देशांना पुरविली आहे. पुष्कळशा देशांची देण्याच्या व्यवहाराच्या बाबतींत इतकी प्रगति झाली आहे कीं, या बाबतींत त्यांनीं लादलेले सर्व निर्बंध दूर करावे किंवा काय असा प्रश्न त्यांच्यापुढें निर्माण झाला आहे. ही सर्व परिस्थिति आंतरराष्ट्रीय व्यवहारांतील सुधारणेची निदर्शक समजली पाहिजे. जानेवारी, १९५४ च्या सुरवातीला युरोपियन आर्थिक संघटनेच्या कक्षेंत येणाऱ्या देशांचा खासगी स्वरूपाचा ७५ टक्के व्यापार, मालाच्या वजनाच्या किंवा प्रमाणाच्या दृष्टीनें मोकळा करण्यांत आला ही गोष्ट विशेष उल्लेखनीय समजली पाहिजे. जगांतील इतर देशांच्या बाबतींत असें म्हणतां येईल कीं, ज्यांच्या जवळ चालू देण्याच्या कामासाठी पैसा उपलब्ध होता व ज्यांच्या जवळ अडचणीच्या प्रसंगीं देण्याचे व्यवहार करण्यासाठीं रिझर्व्ह म्हणजे गंगाजळीच्या स्वरूपाच्या शिलकी रकमा होत्या त्यांनीं परदेशांशीं चालणाऱ्या आपल्या व्यापारी व्यवहारावरील नियंत्रणें जास्त वेगानें सैल केलीं. अशा प्रकारचे उल्लेखनीय देश म्हणजे ग्रेट ब्रिटन, हॉलंड, बेल्जम व पश्चिम जर्मनी. स्टर्लिंग गटांतील देशांनींहि परस्परांशीं चालणाऱ्या व्यापाराचे बाबतींत नियंत्रणें बरींच सैल केली आहेत. दक्षिण व मध्य अमेरिकेंतील नऊ देशांनीं नियंत्रणें पूर्णपणें रद्द केलीं आहेत. यांत मेक्सिको, पनामा, क्यूबा हे देश प्रमुख आहेत. कोलंबिया, इक्वेडोर इ. पांच देशांनीं थोडीफार नियंत्रणें चालू ठेवलीं आहेत. बाकीच्या दक्षिण अमेरिकेंतील देशांनीं मात्र नियंत्रणें जास्त घट्ट केलीं आहेत. मध्यपूर्व व अति पूर्वेकडील देशांना मात्र त्यांच्या परिस्थितीमुळें नियंत्रणें चालू ठेवावीं लागलीं. जपानलाहि देण्याच्या अडचणीमुळें नियंत्रणें चालू ठेवावीं लागलीं.

### नव्या भांडवलाची उभारणी

१९५२ सालांत भारतांत जितकें नवें भांडवल उभारलें गेलें त्याच्यापेक्षा १९५३ सालीं अधिक भांडवल उभारलें गेलें असल्याचें समजतें. भांडवलाच्या एकूण उभारणींत वाढ झालेली दिसत असली तरी नव्या कंपन्यांच्या संख्येंत घटच झालेली आहे. १९५२ सालीं २५४ कंपन्यांना मिळून ३९·७९ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. १९५३ सालीं २३२ कंपन्यांना मिळून ८१·४ कोटी रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. युद्धोत्तर काळांत नव्या भांडवलाची सर्वांत अधिक उभारणी १९४८ सालीं झाली. तेव्हांपासून मात्र नव्या भांडवलच्या उभारणीस ओहोटी लागली. १९५३ सालीं मात्र ओहोटीची प्रवृत्ति नाहींशी होऊन भांडवल उभारणी पुन्हा वाढूं लागल्याचें दिसतें. पुढील तक्त्यावरून भांडवलाच्या उभारणीची कल्पना येईल.

| वर्ष | कंपन्यांची संख्या | भांडवल (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १९४८ | ३७५ | ११५·६६ |
| १९४९ | ३३६ | ६३·०२ |
| १९५० | २६३ | ७४·७२ |
| १९५१ | ३४३ | ५९·५९ |

### " तुटीची अर्थव्यवस्था : " केव्हां व कां ?

वरील विषयावर दि. २१ ऑगस्ट रोजीं रात्रीं ८–१५ वाजतां पुणें नभोवाणी केंद्रावरून श्री. श्री. वा. काळे, संपादक " अर्थ " ह्यांचें भाषण ध्वनिक्षेपित होणार आहे.

**चंद्रावरच्या सफरीची शक्यता**—पृथ्वीवरून चंद्रावर सफर करण्याच्या शक्यतेंत आतां तांत्रिक अडचणी कांहींहि राहिलेल्या नाहींत, असें मत प्रोफेसर थिरिंग ह्या तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. पुरेसा पैसा आणि मनुष्यबळ ह्यांची मात्र आवश्यकता आहे. चंद्रावर जाण्यासाठीं पृथ्वीपासून ६२५ मैल अंतरावर एक उपग्रह प्रथम निर्माण करावा लागेल. तेथून चंद्रावर जाणारी अंतरिक्षांतील बोट आपला प्रवास करूं शकेल, अशी माहिती त्यांनीं दिली.

## साखर कारखान्यांस वाव

### साखरेची मागणी पुरी पाडण्यासाठी आयातीचा अवलंब

चालू वर्षी ७ ३ लक्ष टन साखरेची आयात करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. नोव्हेंबर, १९५३ ते ऑक्टोबर, १९५४ ह्या वर्षात १७.५ लक्ष टन साखरेचा खप होईल, पण उत्पादन १० लक्ष टनांवर जाणार नाहीं. २ लक्ष टन साखर परदेशांतून अगोदरच दाखल झालेली आहे आणि बाकीची लवकरच येईल. ग्रेटब्रिटन, फ्रान्स, स्पेन, पूर्व जर्मनी, पोलंड, क्युबा, फोर्मोसा व जपान ह्या देशांकडून साखर आयात करण्यांत येत आहे. १९४९–५० मध्यें, भारतांत दरमाणशीं साखरेचा खप ५.९ पौंड होता, तो १९५२–५३ मध्यें १० पौंड झाला. पंचवार्षिक योजनेप्रमाणें उत्पादनाचें लक्ष्य १५ लाख टन आहे. म्हणजे १९५५–५६ मध्यें दरमाणशी ८.७ पौंड असें प्रमाण पडतें.

आजच्या अंदाजाप्रमाणें, १९५५–५६ मध्यें १८ ते १९ लक्ष टन साखरेस मागणी येईल; परंतु आज जे कारखाने उभे आहेत, त्यांची उत्पादनक्षमता १५.६ लक्ष टन आहे. सर्व कारखाने दरसाल १२० दिवस चालतीलच, असें नाहीं. म्हणून, प्रत्यक्ष उत्पादनाचा अंदाज १३ लक्ष टनांचा आहे. म्हणजे, उत्पादन न खप ह्यांत ५ लक्ष टनांची तूट पडते. नवे कारखाने उभारण्यासाठी किंवा जुने वाढविण्यासाठी सरकारकडे ५० अर्ज येऊन पोचले आहेत. ५० हजार टन उत्पादन करणाऱ्या कारखान्यास परवाने देण्यांत आलेले आहेत. १६ साखर कारखाने कित्येक वर्षे पडून आहेत. त्यांपैकी कांहीं फार लहान, तर कांहींची यंत्रसामुग्री जुनी–पुराणी झालेली आहे. कांहींच्या क्षेत्रांत उसाचा पुरवठा पुरेसा नाहीं. कांहीं आर्थिक अडचणींत आहेत. हे कारखाने दुसऱ्या, अनुकूल, ठिकाणीं हलविले तर उत्पादनास चालना मिळूं शकेल.

---

### इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना

भारत–सरकार स्थापन करणार असलेलें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन पुढील महिन्याच्या अखेरपर्यंत अस्तित्वांत येण्याचा संभव आहे असें समजतें. व्यापार व उद्योग–खात्याचे मंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील उद्योगपतींची एक सभा ह्या विषयाचा विचार करण्यासाठी नुकतीच भरली होती. कॉर्पोरेशनच्या स्थापनेला पार्लमेंटची मंजुरी लागत नसली तरी भारत सरकार कॉर्पोरेशनला १ कोटी रुपयांची जी रक्कम देणार आहे तीसाठीं लोकसभेची मंजुरी घ्यावी लागेल. कॉर्पोरेशन करणार असलेल्या कार्याचें स्वरूप द्विविध आहे. नवे उद्योगधंदे स्थापन करण्याचा आणि चालू करून मार्गी लागल्यावर ते विकून टाकण्याचा कॉर्पोरेशनचा हेतु आहे. तथापि त्या धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याचा हक्क राखून ठेवण्यांत येण्याचा संभव आहे. कापडाच्या गिरण्या व तागाच्या गिरण्या ह्यांची पुनर्घटना करण्यासाठी कॉर्पोरेशन कर्जे देईल असा अंदाज आहे. नवीन धंदे चालते करून ते विकण्याच्या योजनेला लोकसभेत जोराचा विरोध होईल असें दिसतें. कारण, देशांत राष्ट्रीयीकरणाच्या मागणीनें जोरदार मूळ धरलेलें आहे. कोणते उद्योगधंदे काढावयाचे ते २१ जणांचें संचालक मंडळ ठरविणार आहे. ह्या संचालक मंडळांत उद्योगपति, शास्त्रज्ञ आणि एंजिनिअर्स ह्यांची नेमणूक सरकारतर्फे करण्यांत येणार आहे. नव्या कारखान्यांच्या योजना कॉर्पोरेशन भारत सरकारला सादर करील आणि सरकार पैशाची व्यवस्था करील. उच्च दर्जाचे एंजिनिअरिंगचे व इतर तज्ज्ञ शिकवून तयार करणें, हाहि कॉर्पोरेशनचा एक उद्देश राहील.

## स्वातंत्र्याचा वाढदिवस

**भारतीय स्वातंत्र्याचा पाया भक्कम करण्यासाठी आर्थिक व औद्योगिक उपक्रमांस चालना देणाऱ्या व त्यासाठी मनोभावें झटणाऱ्या व्यक्ती व संस्था ह्यांना आमचे धन्यवाद व अधिक भरीव कार्यासाठी आणि अनुकूल मनोवृत्तीच्या संवर्धनासाठी आमचें शुभचिंतन.** —संपादक

### युद्धबंदीचे परिणाम

जपानमधील आर्थिक परिस्थिति बिघडत चालल्याचीं लक्षणें अधिकाधिक दिसूं लागलीं आहेत. कोरिआंत १९५० च्या जूनमध्यें युद्ध सुरू झालें तेव्हांपासूनच्या चार वर्षांच्या कालांत कोरिआच्या युद्धप्रयत्नासाठी म्हणून अमेरिकेकडून १,३८,६०,००,००० डॉलर्स किंमतीच्या मालाची मागणी जपानच्या कारखानदारांकडे आली. पण कोरिआंतील युद्ध संपल्यापासून अमेरिकेकडून येणाऱ्या मागण्या कमीकमी होऊं लागल्या आहेत. गेल्या बारा महिन्यांत अवघ्या २४,९०,००,००० डॉलर्स किंमतीच्या मालाच्या मागण्या आल्या. १९५३ च्या जूनअखेर आलेल्या मागण्यांपेक्षा वरील आंकडा २२,७०,००,००० डॉलर्सनीं कमी आहे. अमेरिका आपल्याकडून आणखी मालाच्या मागण्या नोंदवीत आहे. परंतु १९५४–५५ सालीं अमेरिका ७१,००,००,००० डॉलर्स किंमतीचा माल विकत घेईल अशी जी अपेक्षा होती ती पुरी होईल असें दिसत नाहीं. गेल्या दोन वर्षांत अमेरिकेनें जपानकडून ८०,००,००,००० डॉलर्स किंमतीचा माल दरवर्षी विकत घेतला. ही मागणी जरी कायम राहिली असती तरीसुद्धां जपानला डॉलर्सच्या देण्याघेण्यांत समतोलता राखतां आली असती कीं नसती ह्यासंबंधी शंका व्यक्त करण्यांत येत आहे. जपानच्या अर्थखात्यानें असा अंदाज केला आहे, कीं १९५४–५५ सालीं जपानला १०,००,००,००० डॉलर्स तूट उभयपक्षींच्या व्यापारांत सहन करावी लागेल. पण कांहीं अर्थशास्त्रज्ञांच्या मतें हा अंदाज फार आशावादी आहे. कोरिआंतील युद्ध थांबल्यावर लष्करी स्वरूपाच्या मालाची मागणी साहजिकच कमी झाली. आतां अतिपूर्वेकडील आणखी एका देशांत म्हणजे इंडोचायनांत युद्धबंदी झाली आहे. त्याचाहि परिणाम त्या भागांतील देशांच्या आर्थिक परिस्थितीवर होणें साहजिक आहे.

---

### " बँकिंग अँड मोनेटरी स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया "

रिझर्व्ह बँकेनें सुमारें १,००० पृष्ठांचा हा अवाढव्य संदर्भ ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत बँकिंग, चलन, नाणें, इत्यादिंबाबत महत्त्वाचे आंकडे एकत्र आणण्यांत आले आहेत. सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांमार्फत वेगवेगळीं प्रकाशनें होतात, त्या सर्वांचा उपयोग करून घेतला आहे. पुस्तकाचे १२ भाग आहेत. प्रत्येक भागाचे प्रारंभीं त्या त्या भागांतील आकड्यांवर प्रकाश पाडणारी व त्यांची मर्यादा दर्शविणारी प्रस्तावना दिलेली आहे. आकड्यांच्या तपशीलाची कल्पना येण्यासाठी एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें, कीं बँकांविषयींचे दिलेले कांहीं तुलनात्मक आंकडे १८६८ सालापासूनचे आहेत. बचतीबाबत आंकडे १८५८ पासूनचे आहेत. देशी व विदेशी विमा कंपन्यांच्या व्यवहारांचे आंकडे १९१३ पासूनचे दिलेले आहेत. पुस्तकाची किंमत ३५ रु. आहे.

---

## बँकांचें उत्पन्न व खर्च ( १९४९ ते १९५३ )

( आकडे लक्ष रुपयांचे )

हिंदी शेड्यूल्ड बँका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | २९,६२ | २९,१० | ३२,२८ | ३४,३८ | ३४,३३ |
| खर्च | २१,७४ | २२,५२ | २४ ७८ | २८,९४ | २७,८१ |
| निव्वळ नफा | ७,८८ | ६,५८ | ७,५० | ५,४४ | ६,५२ |

एक्सचेंज बँका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | ११,२९ | ९,४७ | १३,०६ | १३,३० | ११,७५ |
| खर्च | ६,७१ | ६,१३ | ७,५२ | ९,३४ | ९,१३ |
| निव्वळ नफा | ४,५८ | ३,३४ | ५,५४ | ३,९६ | २,६२ |

हिंदी बिगर-शेड्यूल्ड बँका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | २,१७ | १,४८ | १,९३ | २,११ | १,९६ |
| खर्च | १,७४ | १,२२ | १,७० | १,८८ | १,६३ |
| निव्वळ नफा | ४३ | २६ | २३ | २३ | ३३ |

### हिंदी बँकांच्या भारताबाहेरील शाखा

| देश | १९४९ | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ |
|---|---|---|---|---|---|
| पाकिस्तान | १५३ | ११९ | ९४ | ७३ | ६८ |
| इतर देश | | | | | |
| एडन | — | — | — | — | १ |
| ब्रि. पूर्व आफ्रिका | — | — | — | — | ४ |
| बर्मा | ६ | ७ | ८ | ८ | ८ |
| सिलोन | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| फ्रेंच इंडिया | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| हाँगकाँग | — | — | — | १ | १ |
| जपान | — | २ | २ | २ | २ |
| मलाया | ९ | ९ | १२ | १२ | १२ |
| थाइलँड | २ | २ | २ | १ | १ |
| ग्रेटब्रिटन | २ | २ | २ | २ | ४ |
| एकूण कचेऱ्या | १७८ | १४७ | १२६ | १०५ | १०७ |
| पैकी शेड्यूल्ड बँकांच्या | १४७ | १२५ | १११ | ९३ | ९५ |
| पैकी बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या | ३१ | २२ | १५ | १२ | १२ |

### सर जॉन हंट ह्यांची विजेती कुदळ

एव्हरेस्ट शिखरावरील यशस्वी स्वारीचे नेते, ब्रिगेडिअर सर जॉन हंट, ह्यांनीं आरोहणाचे वेळीं वापरलेली बर्फांत रोवण्याची कुदळ, त्यांनीं लंडन येथील रॉयल युनायटेड सर्व्हिस म्युझियमला नजर केली आहे. २६ मे, १९५३ रोजीं मि. चार्लस इव्हॅन्स व मि. टी. बॉर्डिलो ह्यांनीं एव्हरेस्टचें दक्षिण शिखर गांठलें, त्यावेळीं तिचा उपयोग मि. इव्हॅन्स ह्यांनीं केला होता. सर जॉन हंट ह्यांनीं एव्हरेस्ट मोहिमेस निघण्यापूर्वी ती कुदळ आपल्या पत्नीकडून. उसनी घेतली होती; लेडी हंटनीं १९३७ मध्यें हिमालयांत व नंतर आल्प्स पर्वतांत शौकाखातर गिर्यारोहण करीत असतांना तिचा उपयोग केलेला होता.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.
शेअर भांडवल व रिझर्व रु. १० ७०,३००
ठेवी .... .... .... रु. १,१८,५८,४००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,१३,५००
शाखा:- दादर, माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- बेळगांव, पुणें
स्थापना १९१८

### लिक्विडेशनमध्यें जाऊन अथवा अन्य कारणानें बंद पडलेल्या जॉइंट स्टॉक बँका

| वर्ष १९५३ | बँकांची संख्या | वसूल भांडवल ( लक्ष रु. ) |
|---|---|---|
| आसाम | ३ | ५ |
| बिहार | १ | ५ |
| मुंबई | ४ | ३९ |
| दिल्ली | १ | २ |
| हैद्राबाद | २ | २८ |
| मद्रास | ६ | २१ |
| म्हैसूर | १ | ०·३ |
| पंजाब | २ | ६ |
| त्रावणकोर–कोचीन | ४ | ०·७ |
| त्रिपुरा | १ | ०·८ |
| पं. बंगाल | ६ | ५ |
| १९५३ | ३१ | ११४ |
| १९४८ | ४५ | १८३ |
| १९४९ | ५५ | १३१ |
| १९५० | ४६ | १२८ |
| १९५१ | ६० | ६२ |
| १९५२ | ३१ | १६ |
| १९५३ | ३१ | ११४ |

### रेडिओ टेलिस्कोप

मँचेस्टर विश्वविद्यालयानें एक रेडिओ–टेलिस्कोप बसविण्याची योजना आंखली आहे. या विषयाची माहिती "एंजिनिअर" च्या दि. २५ जून १९५४ च्या अंकांत पान ९४२ वर प्रसिद्ध झाली आहे. या टेलिस्कोपचा उपयोग खगोलशास्त्राच्या अभ्यासाकडे व्हावयाचा आहे. प्रो. लॉव्हेल हे रेडिओ ॲस्ट्रॉनॉमीचे संशोधक आहेत. या रेडिओ- टेलिस्कोपला ५ लक्ष पौंड किंमत पडणार आहे. याच्या पंख्याची उंची ३१० फूट आहे आणि पंख्याचा व्यास २५० फूट आहे. आकाशगंगेंतील जागांतून हायड्रोजन वायूच्या माध्यमांतून पलीकडच्या तारकांचे वेध घेऊन पृथ्वी किती सरते त्याचे व ज्यांना "रेडिओ स्टार" म्हणतात त्यांच्या अंतराचें गणित बसवितां येणार आहे. एवढा रेडिओ–टेलिस्कोप जगांत पहिलाच आहे. रेडिओ–तारकांचें आकारमान व अंतर यांचाहि या साधनानें शोध लागणार आहे. ( महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें, येथें "एंजिनिअर" हें नियतकालिक येतें. )

**सहकारी चळवळीचा मुंबई राज्यांतील सुवर्णमहोत्सव**

सुवर्णमहोत्सवाच्या आठवड्यांत खालील खेडेगांवांत उत्सव साजरा करण्यांत आला :—

| | जिल्हा | | कितीं खेडेगांवांत उत्सव साजरा झाला |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ... | १२४ |
| २ | बडोदें | ... | २२६ |
| ३ | उ. सातारा | ... | २४३ |
| ४ | विजापूर | ... | २२५ |
| ५ | भडोच | ... | ११८ |
| ६ | पुणें | ... | ९८ |
| ७ | खेडा | ... | २३६ |
| ८ | पू. खानदेश | ... | १,३४८ |
| ९ | कुलाबा | ... | ६४ |
| १० | ठाणें | ... | २१४ |
| ११ | गोधा | ... | ९८ |
| १२ | बनासकांठा | ... | ६० |
| १३ | सुरत | ... | १३२ |
| १४ | अमरेली | ... | ३९ |
| १५ | बेळगांव | ... | ३१२ |
| १६ | सोलापूर | ... | २०१ |
| १७ | द. सातारा | ... | १२३ |
| १८ | साबरकांठा | ... | ९१ |
| १९ | प. खानदेश | ... | ३०२ |
| २० | अहमदनगर | ... | ९०० |
| २१ | मेहसाणां | ... | १४४ |
| २२ | मुंबई | ... | ० |
| २३ | अहमदाबाद | ... | ५४ |
| २४ | डांग | ... | ७ |
| २५ | धारवाड | ... | ३१२ |
| २६ | नासिक | ... | १८८ |
| २७ | कोल्हापूर | ... | ८०५ |
| २८ | उ. कानडा | ... | ७९ |
| | | एकूण | ६,७४३ |

**BOMBAY PROVINCIAL CO-OPERATIVE INSTITUTE**

**Co-operative Diploma Examination Result**

**Poona Centre**

The following candidates are declared successful at the Co-operative Diploma Examination held at Poona Centre in June 1954.

**First Class:** 7.

**Second Class:** 3, 4, 6, 12, 18, 19, 21, 22, 29, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 43, 45, 48, 52, 53, 54, 55, 57, 60, 70, 71, 77, 78.

**Pass Class:** 1, 5, 11, 14, 15, 20, 23, 27, 28, 42, 46, 47, 49, 50, 56, 61, 65, 66, 68, 72, 75, 76.


**दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० | |
| | रु. | ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. | ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,७०,२७,००० |

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

**सांगली बँक लि.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | | द. सा. द. शें. |
|---|---|---|
| करंट | ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग | ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग | ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत | ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत | ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## कापूस-उत्पादनांत भारत जवळजवळ स्वावलंबी

कापूसउत्पादनाचे बाबतींत १९५३-५४ मध्यें भारतानें एवढी आघाडी मारली आहे कीं, आपल्या कापूसविषयक गरजांचे बाबतींत भारत जवळजवळ स्वावलंबी होण्याचे मार्गावर आहे. कशामुळें कां होईना पण सामान्यतः कमीच असणाऱ्या सरकारी अंदाजाप्रमाणें देखील देशांतील कापूसउत्पादनांत १९४९-५० मधील २६ लक्ष गांसड्यांवरून १९५३-५४ मध्यें ३९ लक्ष गांसड्यांपर्यंत वाढ झाली आहे. सामान्यतः अधिक बिनचूक असणाऱ्या व्यापारी अंदाजाप्रमाणें तें ४५·२८ लक्ष गांसड्या झालें असावें. ही वाढ देखील मुख्यत्वें लांब व मध्यम धाग्याच्या कापूसउत्पादनांत झाली. त्या जातीच्या कापसाचें उत्पादन पूर्वी १९४७-४८ मध्यें १४ लक्ष गांसड्या असें, तें ३० लक्ष गांसड्यांवर गेलें आहे. त्यांपैकी ७/८ इंचांच्या लांब धाग्याच्या कापसाचें उत्पादन १३ लक्ष गांसड्या आहे.

### खपांत वाढ

उत्पादनवाढीबरोबरच भारतांतील गिरण्यांना लागणाऱ्या कापसाच्या प्रमाणांतहि बरीच वाढ झाली आहे. ३१ ऑगस्ट १९५४ ला संपणाऱ्या समग्र कापूस-हंगामांतील भारतांतील कापसाचा खप ३९ लक्ष गांसड्यांपर्यंत जाईल असा अंदाज असून फाळणीनंतरच्या वर्षांत हा सर्वांत मोठा आंकडा आहे.

देशांत तसेंच देशाबाहेर मागणी असलेल्या जाड्याभरड्या व मध्यम प्रतीच्या कापडाचें वाढत्या प्रमाणांत उत्पादन करतां यावें म्हणून कापड गिरण्या अधिकाधिक प्रमाणांत भारतीय कापसाची मागणी करीत असल्याची सद्यःपरिस्थिति आहे, आणि म्हणून भारतीय कापड गिरण्यांच्या वाढत्या गरजा व्यवस्थितपणें भागविण्यासाठी नजिकच्या भविष्यकालांत कापूसउत्पादनांत वाढ करणें जरूर आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्य गांठण्यासाठी सुमारें ३ लाख गांसड्यांनीं कापूसउत्पादन वाढविण्यास वाव आहे. तथापि ही वाढहि चालू गरजा भागविण्यास पुरेशी नाहीं ही गोष्ट स्पष्ट असल्यामुळें कापूसउत्पादनांत वाढ करणें शक्य असलेल्या राज्यांचे ठरविलेल्या लक्ष्यापलीकडे उत्पादनवाढीचे प्रयत्न स्वागतार्ह ठरतील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील जादा कापूस-उत्पादनाचें लक्ष्य ठरवितांना कापसाकरितां होत असलेल्या वाढत्या मागणीचा विचार केला आहे. हा आंकडा सध्यां तरी पहिल्या पंचवार्षिक योजनेअखेरच्या उत्पादनापेक्षा १० लाख गांसड्यांनीं जास्त ठरविण्यांत आला आहे.

गिरण्यांना लागणाऱ्या आयात कापसाऐवजीं देशांतील कापूस देतां यावा म्हणून अति लांब धाग्याच्या कापसाच्या उत्पादनासाठीं त्यापूर्वीच उपाययोजना केलेली आहे. अशा जातीचे कापूस येथील वातावरणांत योग्यप्रकारें उत्पादन होऊं लागणें हा एक निराळा प्रश्न आहे. मद्रास राज्यांत एम. यू. १ एम. यू. २ आणि मुंबई राज्यांत १७० सीओ. २ व १३४ सीओ २-एम यांसारख्या बारीक धाग्याच्या कापसाचें व्यापारी प्रमाणावर उत्पादन करण्यांत आतांपर्यंत आलेल्या यशामुळें या दिशेनें अधिक प्रयत्नांस चालना मिळावी. कारण त्यामुळें परकीय कापसाच्या आयातींत घट होऊन अत्यावश्यक अशा परकीय हुंडणावळीची बचत होण्यास देशास साह्य होईल.

कापूस-लागवडीच्या क्षेत्रांत वाढ होण्यास अद्यापि वाव आहे, कारण १९५३-५४ मध्यें सुमारें १ कोटी ७० लक्ष एकर जमिनींतच ही लागवड झाली असावी. नियोजनमंडळानें घालून दिलेली कमाल मर्यादा १ कोटी ८० लक्ष एकरांची आहे. परंतु अन्नधान्यें व इतर पिकें यांचें उत्पादन करण्याची गरज लक्षांत घेतां कापसाखालील क्षेत्रवाढीस मर्यादा आहेच, आणि म्हणून एकरीं कापूसउत्पादन वाढविण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उभा रहातो. या दिशेनें कांहीं प्रयत्नहि झाले असून कांहीं अंशीं ते यशस्वीहि झाले आहेत. तरी पण लवकरांत लवकर कमाल मर्यादेपर्यंत लाभ होण्यासाठी हा प्रश्न अधिक पद्धतशीरपणें व जोमानें हातीं घेतला पाहिजे.

कमाल लागवडीच्या पद्धतींचा अंगिकार करून एकरीं उत्पादन वाढविण्यास वाव आहे. आपल्या देशांतील कापसाखालील क्षेत्र जगांतील या पिकाखालील क्षेत्राच्या २०·८ टक्के आहे, तर उत्पादन मात्र जागतिक उत्पादनाच्या अवघें ९·४ टक्के आहे. भारतांतील एकरीं कापूसउत्पादनाचें मान इजिप्तमधल्यापेक्षा ठोकळमानानें एकपंचमांश व अमेरिकेपेक्षा तें एकतृतीयांशच आहे.

मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या योजना पुऱ्या झाल्यावर कालव्याच्या पाण्यावर होणाऱ्या कापसाचें क्षेत्र सध्यां १६ लक्ष एकर आहे तें बरेंच वाढेल व उत्पादनमानावरहि सुपरिणाम होईल. त्या भागांतील तसेंच नियमित पाऊस मिळणाऱ्या प्रदेशांतील कापसाचे पिकास खत देणें, तसेंच सुधारलेल्या जातींचा वाढता वापर करणें हे कापूसउत्पादन वाढविण्याचे इतर मार्ग आहेत. भारतांतील एकरीं कापूसउत्पादन मान वाढविणें हें निरनिराळ्या राज्यांतील संशोधकांना एक आव्हान असून लवकरांत लवकर हें काम यशस्वीपणें पार पाडलें जाईल यांत संदेह वाटत नाहीं.

### उत्पादनवाढीचें श्रेय कसणाऱ्या शेतकऱ्यालाच

कापसाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन होण्याचें श्रेय बहुतांशीं लागवडीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यास दिलें पाहिजे. कापूसउत्पादनास प्रतिकूल स्थिति निर्माण झाल्यास त्यास दुसरें पीक काढावें लागतें वा भांडवल आणि मजूर यांवरील खर्चांत बचत करावी लागते. अधिक उत्पादन काढण्यास तो नाखूष असतो असें नाहीं, तर परिस्थितीमुळें त्यास दुसरा पर्यायच राहात नाहीं.

उत्पादकांनीं योग्य मार्गाचा अवलंब केल्यास उत्पादनांत क्रमशः वाढ होत जाईल आणि देशांतील कापूस गिरण्या वा घरगुती उद्योगधंदेहि उठाव करूं शकणार नाहींत. इतक्या प्रमाणांतील जादा कापसाचें काय करावें, असा प्रश्न त्यांचेपुढें उभा राहण्याचा एक दिवस उजाडेल.

(मध्यवर्ती शेतकीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख, ह्यांचें भारतीय मध्यवर्ती कापूस समितीच्या ७० व्या बैठकीच्या उद्घाटनप्रसंगीं, ३० जुलै रोजीं मुंबई येथें भाषण)

---

**चीनसाठी जर्मन चित्रवाणीचीं यंत्रें**—कम्युनिस्ट चीनसाठी टेलिव्हिजनची यंत्रसामुग्री करण्यांत पूर्व जर्मनीचे कारखाने गुंतले असल्याचें समजतें. १० किलोवॅट शक्तीचा एक प्रक्षेपक पेकिंगकडे रवानाहि झाला आहे. आणखी प्रक्षेपक हातीं आल्यावर शांघाय, नानकिंग, कॅन्टन आणि मुकडेन ह्या शहरांतून प्रक्षेपक केंद्रें उघडण्यांत येतील.

**केरळमधील भूदानयज्ञ**— केरळमध्यें भूदानयज्ञासाठी प्राथमिक लक्ष्य म्हणून २५,००० एकर जमीन मिळविण्याचें केरळ भूदानयज्ञसमितीनें ठरविलें होतें. त्यांपैकी २०,००० एकर जमीन मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

## महाराष्ट्रांतील सहकारी साखर-कारखाने

### रा. सा. खांडे यांचें भाषण

रा. ब. दादासाहेब शेंबेकर यांच्या अध्यक्षतेखालीं रा. सा. व. द. खोडे यांचें " सहकारी साखर कारखाने " या विषयावर सहकारी चर्चामंडळाचे वतीनें शनिवार, दिनांक ७-८-५४ रोजीं व्याख्यान झालें :—

" आपल्या देशांत अजून परदेशी साखर आयात होत असल्यामुळें साखरेचें उत्पादन वाढविण्यास वाव आहे. खाजगी भांडवलदार कंपनींनीं काढलेले कारखाने हे समाजाच्या सर्व भागास जितके उपयुक्त ठरतात त्यापेक्षा सहकारी तत्त्वावरील कारखाने हे अधिक उपयुक्त ठरतात. सहकारी चळवळ गेल्या ५० वर्षांत मुख्यतः कर्जाचे व्यवहार करण्यापुरतीच मर्यादित होती परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर ग्राहक सोसायट्या, शेतकी सोसायट्या, तेलघाणी, मार्केटिंग, इत्यादी क्षेत्रांत सहकाराचा प्रवेश झाला. परंतु सहकाराची खरी उपयुक्तता पक्का माल तयार करणाऱ्या कारखान्यांत प्रवेश करण्यावर अवलंबून आहे. प्लॅनिंग कमिशन व पंचवार्षिक योजना यामुळें सहकारी साखरकारखान्यांना महत्त्व प्राप्त होत आहे. यापूर्वी असे दोन साखरकारखाने स्थापन झाले असून त्यांचें नेतृत्व श्री. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या-कडे आहे. या कारखान्यांचा गेल्या कांहीं वर्षांतील अनुभव चांगला आहे. तेव्हां या पद्धतीनें आणखी १६ कारखाने काढले जाण्यासाठीं डेक्कन कॅनॉल विभागांतील उसाचे मळेवाल्यांनीं योजना मांडल्या असून त्या योजनांची तपासणी करण्यासाठीं प्रा. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालीं कमिटी नेमली गेली आहे. या कमिटीवर श्री. वैकुंठलाल मेहता, श्री. वर्दे व को-ऑपरेटिव्ह सोसायटींचे रजिस्ट्रार हे सभासद आहेत. हे कारखाने मूर्त स्वरूपांत आले म्हणजे महाराष्ट्रांतील सहकारी चळवळींचें उत्पादन क्षेत्रांत पुष्कळ पुढें पाऊल पडेल. "

रा. ब. दादासाहेब शेंबेकर यांनीं योग्य शब्दांत समारोप केला.

---

### गांधी स्मारक निधि : मराठी खुली निबंधस्पर्धा

या स्पर्धेसाठीं महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांतील कोणींहि मराठी भाषेंत प्रबंध पाठवूं शकेल.

पहिलें बक्षीस रु. २५०. दुसरें रु. १५० व तिसरें रु. १००

निबंध अपेक्षित पातळीपेक्षा कमदर्जाचे ठरल्यास बक्षिसांचा फेरविचार केला जाईल.

प्रबंध पाठविण्याची मुदत ता. १५ नोव्हेंबर १९५४. दिवाळीच्या सुट्टीचा प्रबंध लेखकांना उपयोग करतां यावा यासाठीं मुद्दाम जादा मुदत ठेवली आहे. प्रबंधावर प्रकाशनादि सर्व अधिकार गांधी स्मारक निधीचे असतील.

ज्यांना ह्या कामीं मार्गदर्शनाची आवश्यकता वाटेल त्यांनीं त्याबाबत पत्रानें माहिती विचारावी.

सुमारें १२ हजार शब्द ही प्रबंधाची मर्यादा आहे.

**विषय**

गांधीजींची लोकशाहीसंबंधींची कल्पना.

वाढती लोकसंख्या, बेकारी व ग्रामोद्योग.

संघर्ष निवारणाचें अहिंसक तंत्र.

राजकारण व नीतिमूल्यें.

नवभारताचें ध्येय समृद्धि कीं संस्कृति ?

भूदानयज्ञमूलक, ग्रामोद्योगप्रधान अहिंसात्मक समाजरचना

आजच्या समस्यांवर इलाज : शरीरश्रमाधिष्ठित जीवन ?


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक



स्थापना : १९३५

**भांडवल**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४,००,००,०००चे वर |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

★ सेफ कस्टडीसाठीं लहानमोठ्या सीलबंद ट्रंका अगर पेट्या सुरक्षित ठेवण्याची उत्तम सोय.

मुख्य कचेरी:— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

WILICO STRONGHOLD OF PROTECTION

## बिनभांडवली पण किफायतशीर समाजसेवेचा व्यवसाय म्हणजे वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे प्रतिनिधित्व.

## कारण वेस्टर्नचा विमा म्हणजे उत्कृष्ट विमा कंपनी व अत्यंत माफक हप्ते ह्यांचा दुर्मिळ संगम.

अधिक माहितीसाठीं आजच भेटा अगर लिहा.

फोन नं. ३४०२

# वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

शाखा कार्यालय:—वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मी रस्ता, पुणें २


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.